विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासप्रवर्ग प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासप्रवर्ग, व विशेष मागासप्रवर्ग-अ प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती /गट (क्रिमीलेयर) वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी त्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (क्रिमीलेयर)

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः व्हीजेएनटी-२०१४/प्र.क्र.११८/व्हिजेएनटी-१

मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२

तारीख: ३१ जुलै,२०१४

<u>वाचा</u>

१) केंद्र शासन,मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल,पब्लिक ग्रिव्हन्सेस अॅण्ड पेन्शन्स (डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल अॅण्ड ट्रेनिंग) कडील कार्यालयीन ज्ञापन क्रमांक-३६०१२/२२/९३-इएसटीटी (एस.सी.टी.) दिनांक ८ सप्टेंबर, १९९३.

२) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतीक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी-१०९४/प्र.क्र.८६/ मावक-५ , दिनांक १६ जून,१९९४

३) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतीक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी-१०९४/प्र.क्र.८६/ मावक-५ , दिनांक ५ जून,१९९७

४) शासन निर्णय, सामाजिक न्याय,सांस्कृतीक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.१२०/मावक-५ , दिनांक १ नोव्हेंबर,२००१

५) केंद्र शासन,मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल,पब्लिक ग्रिव्हन्सेस अॅण्ड पेन्शन्स (डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल अॅण्ड ट्रेनिंग) कडील कार्यालयीन ज्ञापन क्रमांक-३६०३३/४/९७-इएसटीटी (आई.ई.एस.) दिनांक २५ जुलै, २००३.

६) केंद्र शासन,मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल,पब्लिक ग्रिव्हन्सेस अॅण्ड पेन्शन्स (डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल अॅण्ड ट्रेनिंग) कडील कार्यालयीन पत्र क्रमांक-३६०३३/५/२००४-इएसटीटी (आई.ई.एस.) दिनांक १४ ऑक्टोंबर, २००४.

७) शासन निर्णय, सामाजिक न्याय,सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी-१० /२००४/प्र.क्र.६८७/मावक-५ , दिनांक २९ ऑक्टोंबर, २००४.

८) शासन परिपत्रक,सामाजिक न्याय,सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय विभाग क्रमांक सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१२२/मावक-५, दिनांक २० ऑक्टोंबर, २००६.

९) केंद्र शासन,मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल,पब्लिक ग्रिव्हन्सेस अॅण्ड पेन्शन्स (डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल अॅण्ड ट्रेनिंग) कडील कार्यालयीन ज्ञापन क्रमांक-३६०३३/३/२००४-इएसटीटी (आई.ई.एस.) दिनांक १४ ऑक्टोंबर, २००८.

१०) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतीक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.६९७/ मावक-५ , दिनांक १३ जानेवारी,२००९
११) शासन पत्र, समाजकल्याण,सांस्कृतीक कार्य व क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.६९७/ मावक-५ , दिनांक २७ फेब्रुवारी,२००९
१२) शासन पत्र,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. इमाव-२०१३/प्र.क्र.१/विजाभज-१, दिनांक २२ जानेवारी,२०१३.
१३) शासन परिपत्रक,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी-२०१२/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दिनांक २५ मार्च,२०१३.
१४) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.६९७/विजाभज-१, दिनांक २४ जून,२०१३.
१५) शासन परिपत्रक,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२/विजाभज-१,दिनांक १७ ऑगस्ट,२०१३
१६) शासन सामान्य प्रशासन विभाग, सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३, दि,०९ जुलै,२०१४ व शासन सामान्य प्रशासन विभाग, सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१४, दि.०९ जुलै,२०१४.
१७) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/ मावक, दिनांक १५ जुलै, २०१४.
१८) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी-१०/२०१४/ प्र.क्र.१३१/ मावक, दिनांक २२ जुलै, २०१४.
१९) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.विजाभज-२०१४/प्र.क्र.११८/विजाभज-१,दिनांक ३१ जुलै,२०१४.

शासन परिपत्रक

केंद्रशासनाने इतर मागासवर्ग प्रवर्गास आरक्षणाचे फायदे देण्यासाठी इतर मागासवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट वगळून इतर व्यक्तींना उन्नत व प्रगत व्यक्ती/गटामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (नॉनक्रिमीलेयर सर्टीफिकेट) देण्याच्या कार्यपध्दती संदर्भात वेळोवेळी विहित केलेले निकष राज्यशासनाने महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासप्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) अन्वये महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग व

विशेष मागासप्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (क्रिमीलेयर) वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी कार्यपध्दती शासन परिपत्रक दिनांक २५ मार्च, २०१३ अन्वये निर्गमित केलेले आहे.

२. वरील आरक्षण अधिनियमात शासन अधिसूचना क्र.१३ व १४ दिनांक ०९ जुलै,२०१४ अन्वये सुधारणा करुन शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासप्रवर्गातील मराठा समाजास व विशेष मागासप्रवर्ग (अ) यामध्ये मुस्लीम गटाचा समावेश केला असून अनुक्रमे १६ व ५ टक्के एवढे आरक्षण निश्चित केलेले आहे. या दोन्ही प्रवर्गातील समाज/गटास लागू करण्यात आलेले आरक्षण हे उन्नत व प्रगत (क्रिमीलेयर) घटकांना लागू होणार नाही असेही आदेशीत करण्यात आलेले आहे. त्यानुसार शासन राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (क्रिमीलेयर) वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी शासन परिपत्रक दिनांक २५ मार्च, २०१३ अन्वये विहित केलेली कार्यपध्दती शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासप्रवर्गातील मराठा समाजास व विशेष मागासप्रवर्ग (अ) यामध्ये मुस्लीम गटातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (क्रिमीलेयर) वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी लागू करण्यास यापरिपत्रकान्वये शासन मंजूरी देत आहे.

३. शासन राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासप्रवर्गातील मराठा समाजास व विशेष मागासप्रवर्ग (अ) यामध्ये मुस्लीम गटातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (क्रिमीलेयर) वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी याप्रवर्गातील उन्नत व प्रगत गटाच्या (क्रिमीलेयरच्या) मार्गदर्शक तत्वासंदर्भात नॉनक्रिमीलेयरचे प्रमाणपत्र देतांना वेळोवेळी काढलेले आदेश विचारात घेण्यात यावेत.

४. सद्यस्थितीत शासन निर्णय दिनांक २४ जून,२०१३ अन्वये नॉनक्रिमीलेयरची उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाख एवढी तसेच नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र कालावधी वैधतेबाबतचे दिनांक १७ ऑगस्ट,२०१३ चे परिपत्रक विचारात घेण्यात यावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०७३११७२०३२८८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Pandurang Wadte

Digitally signed by Kiran Pandurang Wadte
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Social Justice &Spl Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Kiran Pandurang Wadte
Date: 2014.07.31 17:19:44 +05'30'

(कि. पां. वडते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
७. मा.अपर मुख्य सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९. मा.महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१०.आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११.संचालक,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण,पुणे
१२.सर्व विभागीय आयुक्त,(महसुल)
१३.सर्व जिल्हाधिकारी
१४.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
१५.सर्व उपविभागीय अधिकारी (महसुल)/सर्व उपजिल्हाधिकारी (महसुल)/सर्व तहसीलदार
१६.सर्व प्रादेशिक उपायुक्त (समाजकल्याण)
१७.सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण,
१८. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१९.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षण) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
२०.मा.सचिव,सा.न्याय यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई.
२१.सर्व कार्यासन अधिकारी,सा.न्या.व वि.स.विभाग,मंत्रालय,मुंबई
२२.निवड नस्ती, विजाभज-१